पशु-आहार

# चारा पिकांमधील विषारी घटकांचा जनावरांच्या आरोग्यावर होणारा दुष्परिणाम



**डॉ. शिल्पा मोडेकर (साळुंके)**
(मो.नं. ९४२२२९०५५५)
सहायक प्राध्यापिका,
क्रांतिसिंह नानासाहेब पाटील
पशुवैद्यकीय महाविद्यालय,
ता. शिरवळ, जि. सातारा





काही विषयुक्त घटक, कीटकनाशकांमधील रसायनांचे अवशेष यांमुळे चारा दूषित होतो. असा सदोष आहार पोटात गेल्याने जनावरे आजारी पडतात. वेळप्रसंगी यातून उद्‌भवलेले विकार जीवघेणेही ठरू शकतात. यासाठी विशेषत्वाने पावसाळ्यात जनावरांसाठी योग्य प्रकारे चारा व्यवस्थापन करणे अनिवार्य ठरते.

**पा**वसाळ्याची सुरुवात म्हणजे आपले शेतकरी तसेच पशुपालक बांधवांकरिता आनंदाचा आणि तितकाच धावपळीचा काळ असतो. पावसाळा म्हटलं की, हिरव्या चाऱ्याची मुबलक उपलब्धता आणि त्यानंतर हा हिरवा चारा व्यवस्थित साठवून, वर्षभर वैरण पुरेल याची तरतूद करण्याकरिता चाललेली धडपड! तर अशा या चाऱ्यासाठी तरतूद करण्याची आणि आपल्या जनावरांच्या आहार व्यवस्थापनाची खूपच महत्त्वाची जबाबदारी पशुपालकांवर असते. पण सहसा असे निदर्शनास येते की, चारा पिकांवरील रोगांमुळे किंवा त्यांची साठवणूक करताना (म्हणजे एकूणच चारा व्यवस्थापनात) बऱ्याच त्रुटी राहून जातात आणि याचे गंभीर परिणाम जनावरांच्या आरोग्यावर होतात.

चारा पिकांची व्यवस्थित नियोजनबद्ध आखणी, वाढ आणि छाटणी योग्य वेळी केल्यास, जनावरांच्या आरोग्यास हानिकारक विषारी घटक उत्पन्न होत नाहीत. त्यातल्या त्यात चारा वैरणीतून विषबाधा होण्याची कारणे आणि त्याला अटकाव कसा करता येईल, हे जाणून घेणे खूपच महत्त्वाचे ठरते. चारा कोणत्या कटिबंधात उगवला गेला आहे, त्यास कुठली खते वापरली गेली आहेत, त्यांचे प्रमाण कसे होते हे देखील व्यवस्थापनात प्रकर्षाने गृहीत धरावयास हवे. प्रामुख्याने उष्ण कटिबंधात आढळणाऱ्या चारा पिकांमध्ये नायट्रेट, ऑक्झेलेट्स, हायड्रोसायनिक इत्यादी विषारी घटक आढळतात.

१. **नायट्रेट** : चारा पिकांमध्ये नत्रयुक्त खते जर प्रमाणापेक्षा अतिरिक्त देण्यात आली तर त्या चाऱ्यामुळे जनावरांना बाधा होण्याचे प्रमाण वाढते. नायट्रेटचे प्रमाण ३०० पीपीएम पेक्षा जास्त नसावे. तो अधिक झाल्यास म्हशी, गायी, शेळ्या- मेंढ्या यांना अपायकारक ठरतो. त्यामुळे अशा चाऱ्यापासून तयार करण्यात आलेला मूरघास जनावरांच्या आरोग्यास हानीकारक ठरतो.

२. **ऑक्झेलेट्समुळे होणारी विषबाधा** : ऑक्झेलेट्सचे प्रमाण हे बाजरी कुळातील प्रजातींमध्ये भरपूर असते. असा चारा जनावरांच्या खाण्यात आला आणि त्याचे प्रमाणबद्ध नियोजन नसले तर जनावराच्या शरीरातील कॅल्शियमच्या प्रमाणावर त्याचा प्रतिकूल परिणाम होऊन कॅल्शिअमची कमतरता होते. त्यामुळे जनावरे अशक्त होऊ लागतात. योग्य ते औषधोपचार आणि आहार व्यवस्थापन न केल्यास जनावर दगावण्याचा संभव असतो.

३. **कीटकनाशकांच्या फवारणीमुळे होणारी विषबाधा** : विविध चारा पिकांवर वेळोवेळी फवारण्यात येणारी कीटकनाशके व त्यांचे अवशेष पानांमध्ये आणि झाडांच्या खोडांमध्ये राहून जातात. अशा चाऱ्याचा आहारात समावेश झाल्यास विषबाधा होण्याची शक्यता असते. हे टाळण्याकरिता फवारणीनंतर सदर पिके ही २१ दिवसांनंतर कापणीस घ्यावी. तद्नंतर स्वच्छ धुवून घ्यावी आणि मगच जनावरांच्या आहारात समाविष्ट करावीत.

४. **हायड्रोसायनिक ॲसिड** : बाजरीचे पीक, कोवळी ज्वारी या पिकांमध्ये हायड्रोसायनिक ॲसिड आढळते. अशा पिकांच्या झाडांमध्ये सर्व भागात समप्रमाणात आम्लता आढळून येत नाही. हे प्रमाण वेगवेगळे असते. ज्वारीच्या पानात आणि खोडात आम्ल जास्त असते. पण असेच प्रमाण या पिकांच्या मुळांमध्ये आणि खोडामध्ये नसते. म्हणून पशुवैद्यकाच्या सल्ल्यानेच आपल्या जनावरांच्या आहाराचे व्यवस्थापन करणे महत्त्वाचे ठरते.

५. **मायमोसिनची विषबाधा** : इतर विषारी घटकांप्रमाणेच चारा पिकांमध्ये अल्प प्रमाणात मायमोसिन हा विषारी घटक आढळतो. सुबाभूळ, लाजाळू यांच्यात मायमोसिनचे प्रमाण अधिक असते. त्यातल्या त्यात लाजाळू वनस्पतीमध्ये या विषारी घटकाचे प्रमाण अधिक आढळते. रवंथ करणाऱ्या जनावरांमध्ये याचे प्रमाण आणि तीव्रता अधिक नसते, पण तरीही मोठ्या जनावरांना सदर चारा पिके/ वनस्पती दररोज ४-५ किलो पेक्षा अधिक प्रमाणात देऊ नयेत. सुबाभूळ खाऊ घालताना प्रमाणबद्धता पाळावी.

या सर्व चारा पिकांमधून विषबाधा होण्याची कारणे आपण पाहिली आणि त्याचे नियोजन, अटकाव कसा करावा, ते देखील आपण पाहिले. पण सर्वसाधारपणे असे पाहण्यात येते की, सलग एकाच प्रकारचा चारा खाण्यामुळे किंवा जास्त प्रमाणात चारा खाण्यात आल्यामुळे देखील जनावरांना अनेकदा पोटशूळ उठतो. जनावरांच्या पोटात वायू निर्माण होतो. वायूचे प्रमाण पोटात वाढल्यास जनावराच्या हृदयावर दाब पडू लागतो. असा दाब पडण्यामुळे अनेकदा जनावर दगावते. म्हणून फक्त हिरवा चारा किंवा फक्त कोरडा/ सुका चाराच देण्याचे टाळावे. हिरव्या आणि सुक्या चाऱ्याचे प्रमाण समतोल राखून ठरवावे, जेणेकरून अशी पोटफुगी टाळता येऊ शकेल. एकूणच काय, फक्त योग्य आहार देणे गरजेचे नसून प्रमाणबद्ध, संतुलित आहार जनावरास देणे हितकारक ठरते. यातून चारा पिकांचे आहारातील महत्त्व किती मोठी भूमिका पार पाडते, हे लक्षात येते. ■